लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील रास्तभाव दुकानात (PoS) उपकरणे बसविण्याकरीता System Integrator यांच्या निवडीबाबत.

महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांकः साविबा २०१७/प्र.क्र. ८२ /सं.क.
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: २१ सप्टेंबर, २०१७

वाचा :-

१) राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ (२०१३ चा २०)
२) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक: साविबा २०१५/ प्र.क्र.२०/ सं.क. दि. १८ मे, २०१६

प्रस्तावना :-

लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या संगणकीकरण प्रकल्पांतर्गत रास्तभाव दुकानातील शिधावस्तुचे वितरण करतांना लाभार्थ्यांची बायोमॅट्रीक ओळख पटवून Point of Sale Device (PoS) उपकरणाद्वारे शिधावस्तू वितरण करण्याचा निर्णय दि.१८ मे, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला होता. सदर Point of Sale Device (PoS) रास्तभाव दुकानात बसविण्याकरीता System Integrator यांची निवड करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

रास्तभाव दुकानांत PoS उपकरणांव्दारे शिधावस्तुंचे वितरण करण्याकरीता “Transaction based model” वापरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यानुसार राज्यातील सर्व रास्तभाव दुकानात System Integrator मार्फत PoS उपकरणे बसविण्यात आली आहेत.

२. रास्तभाव दुकानांत PoS उपकरणे बसविण्यासाठी राज्यातील रास्तभाव दुकानांची तीन गटात विभागणी करण्यात आली व System Integrator निवडण्याकरीता दि. १८ जुलै, २०१६ रोजी Request for Proposal (RFP) https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली. त्या अनुषंगाने एकुण ४ System Integrator (SI) संस्थांनी RFP ला प्रतिसाद दिला. प्राप्त तांत्रिक निविदा दि. २४ ऑगस्ट, २०१६ रोजी व Commercial Bid दि. २१ सप्टेंबर, २०१६ रोजी प्रशासकीय विभाग खरेदी समितीसमोर उघडण्यात आल्या. सदर निविदा प्रकिया पारदर्शक पध्दतीने राबवून System Integrator व्दारे प्राप्त दरांना उच्चाधिकार समितीच्या दि. २ नोव्हेंबर,२०१६ व दि. १० नोव्हेंबर,२०१६ रोजीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. उच्चाधिकार समितीच्या मान्यतेनुसार प्रत्येक गटांकरिता System Integrator यांची निवड करण्यात आली आहे. निवड झालेल्या ३ System Integrator यांच्या दरांचा तपशील खालीलप्रमाणे-

गट	एल-१ ठरलेल्या संस्था	अंतिम दर (₹. प्रति क्विंटल)
गट १ (कोकण-नाशिक)	M/s Oasys Cybernetics Pvt. Ltd.	१६.९०
गट २ (पुणे-औरंगाबाद)	M/s Link-well	१९.४१
गट ३ (अमरावती-नागपूर)	M/s Integra System	२६.००

सदर System Integrator यांना दिनांक २४ नोव्हेंबर, २०१६ रोजीच्या पत्रान्वये Letter of Intent (LoI) देण्यात आले व दि. ३ फेब्रुवारी, २०१६ रोजी या तीन System Integrator सोबत Master Service Agreement (MSA) करण्यात आले.

३. Request For Proposal (RFP) व Master Service Agreement (MSA) मधील अटी व शर्ती System Integrator यांना बंधनकारक असतील.

४. राज्यातील सर्व रास्तभाव दुकानांतील PoS उपकरणांव्दारे झालेल्या शिधावस्तुंच्या विक्रीचा (Transaction) तपशील विभागाच्या www.mahafood.gov.in या संकेतस्थळावर “ऑनलाईन सेवा” या शिर्षाखाली “ऑनलाईन रास्तभाव दुकाने” या लिंकवर उपलब्ध आहे.

५. हा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र. सीओएम-१०९८/ प्रक्र.२१२/९८/३९ दि.०५ ऑक्टोबर, २००१ च्या तरतूदीस अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९२११६४८३४७२०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Mahesh Dinkar Pathak

Digitally signed by Mahesh Dinkar Pathak
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Food,Civil Supplies And Consumer Protection Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e9535c95dc1a6714290a6a1e084b3bb4cc266f737f88ea4b79e3f83c4a7ca12d, cn=Mahesh Dinkar Pathak
Date: 2017.09.21 16:39:12 +05'30'

(महेश पाठक)
शासनाचे प्रधान सचिव

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव,
२) मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
३) मा. मंत्री, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव.
४) मा. राज्यमंत्री, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, यांचे खाजगी सचिव,
५) मा. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
६) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई.
७) अपर मुख्य सचिव, (वित्त) महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
८) प्रधान सचिव, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
९) सर्व प्रशासकीय विभागाचे सचिव,
१०) सर्व विभागीय आयुक्त,
११) नियंत्रक (शिधावाटप) व संचालक नागरी पुरवठा(गो/वा),मुंबई,
१२) सर्व जिल्हाधिकारी,
१३) सर्व उप आयुक्त (पुरवठा),

१४) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी,
१५) सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी,
१६) वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई,
१७) उप संचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्त कार्यालय, मुंबई.
१८) सर्व उप सचिव/अवर सचिव/सर्व अधिकारी,अ.ना.पु.व ग्रा.सं.विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई,
१९) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (५ प्रती),
२०) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,ग्रंथालय ६ वा मजला,विधान भवन,मुंबई. (१०प्रती)
२१) मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची कार्यालये, (प्रत्येकी ५ प्रती),
२२) सर्व विधान परिषद सदस्य व विधान सभा सदस्य
२३) सर्व विरोधी पक्षनेते.
२४) निवड नस्ती (सं.क.).